**प्रेसनोट** **दि.२४/०८/२०१९**

## अलंकार पोलिस स्टेशन पुणे शहर

## पडून गहाळ झालेला मोबाईल दिला परत

दि.२२/०८/२०१९ रोजी इसम नामे गणेश सुरेश सुपे, रा. म्हाडा कॅालनी कर्वेनगर, पुणे यांनी त्यांना कोणाचातरी मोबाईल सापडल्याने तो अलंकार पो.स्टे. येथे जमा केला. सदरबाबत दिवसपाळी अधिकारी पीएसआय साळवे, ठाणे अंमलदार सपोफौ चव्हाण, व पो.शि. चव्हाण, यांनी सदर मोबाईल वरुन कॉन्टॅक्ट केला असता तो इसम नामे बसवराज शंकर पुजारी, वय-४५ वर्षे, धंदा- भाजी विक्री, रा. सिध्दी गार्डन, म्हात्रे पुलाजवळ, पुणे यांचा असल्याचे समजले व त्यांनी सांगितले की, माझा मोबाईल खिशामधुन पडून गहाळ झाल्याने त्याचा शोध घेतला पण मिळुन न आल्याने मी निराश झालो होतो. सदर बाबत खात्री करुन सदर मोबाईल त्यांचे ताब्यात दिला असता त्यांनी पोलीसांचे व इसम नामे गणेश सुपे यांचे आभार मानुन कैतुक केले.